
ISSN: 2393-8900 IMPACT FACTOR : 2.7825(UIF) VOLUME - 11 | ISSUE - 8 | APRIL - 2025

HISTORICITY RESEARCH JOURNAL

# नवीन शैक्षणिक धोरण 2020 चिकित्सक अभ्यास



**डॉ. युवराज सुरवसे**
संशोधक मार्गदर्शक (एम.ए., पीएच.डी., सेट) छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्टस् अँड कॉमर्स, सोलापूर जि. सोलापूर
**सौ जयश्री श्रीकांत मेलगेपाटील**
मार्गदर्शक ( एम. ए. डी. एड. सेट ) छत्रपती शिवाजी नाईट कॉलेज ऑफ आर्ट्स अँड कॉमर्स, सोलापूर जि. सोलापूर

## प्रस्तावना:-

कोणत्याही देशाचे भविष्य हे तेथील शैक्षणिक धोरणावर अवलंबून असते. शैक्षणिक धोरणाद्वारे जी शिक्षण व्यवस्था देशात राबवली जाते त्यावरच येणाऱ्या पिढ्यांचे भविष्य अवलंबून असते. देशाला सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, राजकीय अशा सर्वच बाबतीत अग्रस्थानी न्यायचे असेल तर त्या देशाचे शैक्षणिक धोरण हे दूरदर्शी व भविष्यवेधी असणे गरजेचे आहे.

आपला भारत देश 15 ऑगस्ट 1947 रोजी स्वतंत्र झाला. स्वतंत्र भारताचे पहिले शैक्षणिक धोरण 1968 मध्ये इंदिरा गांधी सरकारने जाहीर केले. हे शैक्षणिक धोरण मुख्यतः कोठारी आयोगाच्या शिफारशींवर आधारित होते. त्या काळात भारतात गरिबीचा दर 62% होता, अशा वेळी देशभरात शैक्षणिक संधी निर्माण करून गरीबी हटाव हा कार्यक्रम देखील राबवण्यात आला.1968 चे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे देशात समान शैक्षणिक संधी निर्माण करणे तसेच देशाच्या सर्व भागांमध्ये दर्जेदार शिक्षणातील अडथळे दूर करणे या बाबींवर आधारित होते.10+2+3 असा शैक्षणिक आकृतीबंध स्वीकारण्यात आला. त्यानंतर 1986 मध्ये राजीव गांधी सरकारने दुसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण जाहीर केले. या धोरणांमध्ये देखील 10+2+3 हा शिक्षणाचा आकृतीबंध कायम करण्यात आला. या धोरणात प्रामुख्याने महिला, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती यांना समान शैक्षणिक संधी उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. तसेच या शैक्षणिक धोरणामध्ये वेगवेगळे उपक्रम राबवण्यात आले जसे की ऑपरेशन ब्लॅक बोर्ड, आर्थिक व दुर्बल घटकांसाठी शैक्षणिक संधी, अनौपचारिक अभ्यासक्रम, सार्वजनिक ग्रंथालय, दुर्गम भागात प्राथमिक शाळा, ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांसाठी नवोदय विद्यालय या प्रकारचे उपक्रम या शैक्षणिक धोरणामध्ये राबविण्यात आले. 1992 मध्ये या धोरणात काही दुरुस्त्या करण्यात आल्या.

यानंतर जवळपास 34 वर्षांनी नरेंद्र मोदी सरकारने देशाचे तिसरे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण म्हणजेच एनईपी 2020 जाहीर केले. सदर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण हे इस्रोचे माजी अध्यक्ष के. कस्तुरीरंगन यांच्या अध्यक्षतेखाली तयार करण्यात आलेले आहे. या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाला केंद्रीय मंत्रिमंडळाने 29 जुलै 2020 मध्ये मंजुरी दिली . सदर शैक्षणिक धोरणामध्ये सर्जनशीलता, चिकित्सक विचार, कल्पक विचार, कृत्रिम बुद्धिमत्ता, समग्र आरोग्य, पर्यावरण शिक्षण, जागतिक नागरिकत्व यासारखे उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. आजची मुले ही उद्याचे निर्माते आणि भविष्यातील सुजाण नागरिक आहेत असे म्हटले जाते. उद्याच्या जगाचे नेतृत्व करणारी व वेगवेगळ्या क्षेत्रात भरीव योगदान देणारी पिढी तयार करणे हे राष्ट्रीय शैक्षणिक

धोरण 2020 चे उद्दिष्ट आहे. युनेस्कोने शिक्षणाची व्याख्या "शिकायचे कसे ?. हे शिकणे म्हणजे शिक्षण 'लर्निंग टू लर्न अशी केली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये मुलांमध्ये एकविसाव्या शतकातील कौशल्य म्हणजे 6c, क्रिटिकल थिंकिंग, क्रिएटिव्ह थिंकिंग, कोलाब्रेशन , कम्युनिकेशन , कॉन्फिडन्स, कँम्पशन विकसित करण्याच्या दृष्टीने अनेक बदल केलेले आहेत.

अध्ययन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे शिक्षक, विद्यार्थी हे अध्ययन प्रक्रियेतील केंद्रीभूत घटक आहेत देशाच्या सर्वांगीण प्रगतीत शिक्षण क्षेत्रात घडणाऱ्या गुणात्मक बाबींचा वाटा महत्वपूर्ण आहे. या अनुषंगाने कालानुरूप अध्ययन अध्यापन प्रक्रिया समृद्ध करण्यासाठी नवीन शैक्षणिक धोरणामध्ये विविध प्रशिक्षण, कार्यशाळा,चर्चासत्रे, प्रदर्शने इत्यादीचा अवलंब करण्याचे नियोजित आहे.

## नवीन शैक्षणिक धोरणाची प्रमुख उद्दिष्टे

1. शालेय आणि उच्च शिक्षणात सुधारणा करणे.
2. भारताला जागतिक ज्ञान महासत्ता बनवणे.
3. व्यावसायिक शिक्षणासह उच्च शिक्षणातील नोंदणी वाढवणे.
4. आंतरशाखीय अभ्यासाला प्रोत्साहन देणे.
5. विद्यार्थ्यांना नवीन संधी आणि लवचिक अभ्यासक्रम पर्यायांमध्ये प्रवेश देणे.
6. विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडी आणि क्षमतांना अनुकूल असलेले वर्ग निवडू देणे.
7. भाषा मातृभाषेला प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यावर अधिक भर देण्यासाठी इयत्ता पाचवी पर्यंत शिक्षण माध्यम स्थानिक गृह भाषांमध्ये असेल.
8. तीन ते सहा वर्षाच्या मुलांसाठी दर्जेदार बालपण शिक्षण व निश्चित करणे.
9. शालेय अभ्यासक्रम 5+ 3+3+4 वर्षाच्या स्वरूपात नवीन संरचनेचे अनुसरण करणे.

## नवीन शैक्षणिक धोरणाचे चार प्रमुख घटक

1. शालेय शिक्षण
2. उच्च शिक्षण
3. विचार करण्याचे इतर महत्वाचे केंद्रीय मुद्दे
4. अंमलबजावणी

## राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 ची वैशिष्ट्ये

### 1] शैक्षणिक संरचना बदल

10+2+3 या शिक्षण प्रणाली ऐवजी 5+3+3+4 अशी नवीन शैक्षणिक संरचना राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये तयार करण्यात आलेली आहे .

फाउंडेशनल स्टेज - 3 ते 8 वर्षे

प्रिपरेटरी स्टेज - 8 ते 11 वर्षे

मिडल स्टेज - 11 ते 14 वर्षे

सेकंडरी स्टेज - 14 ते 18 वर्षे यांचा समावेश आहे .

**A] पहिला स्तर पायाभूत स्तर : { अंगणवाडी इयत्ता पहिली व दुसरी }**

हाच स्तर दोन भागामध्ये विभागलेला आहे.

पहिला भाग वय वर्ष 3 ते 6 यामध्ये शिशुविहार, अंगणवाडी, बालवाडी या तीन वर्गांचा समावेश असेल .

दुसरा भाग या भागात वय वर्ष 6 ते 8 ज्यामध्ये इयत्ता पहिली व दुसरीचा समावेश असेल .

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे पहिले असे शैक्षणिक धोरण आहे ज्यामध्ये पहिल्यांदाच पूर्व प्राथमिक वर्गांचा समावेश शालेय अभ्यासक्रमात करण्यात आलेला आहे. पूर्व प्राथमिक वर्ग हे शालेय वर्गांना जोडल्यामुळे निश्चितपणे विद्यार्थी गुणवत्ता सुधारण्यासाठी मदत होणार आहे .

**B] दुसरा स्तर पूर्वाध्ययन स्तरः { इयत्ता तिसरी ते पाचवी }**

या स्तरांमध्ये इयत्ता तिसरी ते पाचवीच्या वर्गांचा समावेश केला गेला आहे. इयत्ता तिसरीपर्यंत शिक्षण हे मातृभाषेतून दिले जावे अशी शिफारस यामध्ये केलेली आहे. मात्र विद्यार्थ्यांना द्विभाषा निवडण्याचे स्वातंत्र्य असेल इयत्ता तिसरीपर्यंतच्या मुलांना वाचन व संख्याज्ञान प्राप्त व्हावे याकरिता विशेष लक्ष केंद्रित केले जावे असे अपेक्षा राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 मध्ये व्यक्त केलेली आहे आणि त्या अनुषंगाने केंद्र सरकारने “निपुण भारत” हा उपक्रम सुरू केलेला आहे.

**C] तिसरा स्तर पूर्व माध्यमिक स्तर : {इयत्ता सहावी ते आठवी }**

या स्तरांमध्ये इयत्ता सहावी ते आठवीच्या वर्गांचा विचार केला गेला आहे. ज्याद्वारे विषयाच्या अमूर्त संकल्पनांवर चर्चा आणि विद्यार्थ्यांचे अध्ययन सुरू होईल त्यांची योग्य तयारी करून घेणे, ही तयारी गणित, कला, खेळ, सामाजिक शास्त्रे, मानव विद्या आणि व्यावसायिक शिक्षण या विषयातून करून घेण्यात येईल. विषयांमध्ये परस्पर संबंध शोधणे आणि प्रत्येक विषयामध्ये अनुभव आधारित शिक्षण देण्यावर भर देण्यात आलेला आहे.

**D] चौथा स्तर माध्यमिक स्तरः { इयत्ता नववी ते बारावी }**

माध्यमिक स्तरावर मधल्या टप्प्यातील विषय आधारित अभ्यासक्रम व अध्यापन शास्त्रीय शैलीवर आधारित चार वर्षांचा बहुशाखिय अभ्यासक्रम आहे. हा अभ्यासक्रम गहन विचार, जीवनाच्या आकांक्षावर आधारित लक्ष देणारा आणि विद्यार्थ्यांचा विषय निवडी संबंधी लवचिकता यांनी युक्त असेल. या स्तरात इयत्ता नववी ते बारावीपर्यंत एकत्रित विचार केला गेला असून शाखांचे एकत्रित करण करण्यात यावे. त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे विषय निवडण्याचे स्वातंत्र्य दिले जावे, बोर्डाची परीक्षा ही दोन सत्रांमध्ये घेतली जावी, मूल्यांकनात स्वयं मूल्यांकन, सहाध्यायी मूल्यांकन यांचा समावेश केला जावा असा अतिशय व्यापक विचार राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये करण्यात आलेला आहे.

### 2] मातृभाषेतून शिक्षण

एनइपी 2020 मध्ये इयत्ता पाचवी पर्यंत शक्यतो आठवीपर्यंत शिक्षण हे मातृभाषा किंवा प्रादेशिक भाषेतून देण्यात यावे यावर भर देण्यात आलेला आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या संज्ञानात्मक विकासास मदत होईल त्याचप्रमाणे विषयांचे संबोध विद्यार्थ्यांना सहज स्पष्ट होऊन त्यांना अभ्यासाची गोडी निर्माण होईल.

### 3] बहुविध विषय निवडीची सुविधा

विद्यार्थ्यांना विज्ञान, कला, वाणिज्य इत्यादी पैकी कोणतेही विषय निवडण्याची मुभा देण्यात आलेली आहे. ज्यामुळे त्यांच्या आवडीनिवडीला वाव मिळून करिअरच्या दृष्टीने अधिक स्वातंत्र्य मिळेल. बहुभाषिकतेला चालना देण्यासाठी जोर देण्यात आला असून मुलांना त्यांच्या देशातील समृद्ध आणि विपुल भाषांबद्दल माहिती जाणून घेता येईल आणि शिकता येईल. सध्या यासाठी केंद्र सरकार "एक भारत श्रेष्ठ भारत" हा उपक्रम देशभर राबवत आहे.

### 4] शिक्षक प्रशिक्षण

प्राथमिक शिक्षणापासून ते उच्च शिक्षणापर्यंत कार्यरत असणाऱ्या सर्व शिक्षकांच्या सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा तयार करण्यात येणार असून त्यामध्ये शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी वेगवेगळ्या योजना तयार करण्यात आलेल्या आहेत. ज्यामुळे त्यांच्या कौशल्यांचा विकास होईल आणि शिक्षणाची गुणवत्ता वाढेल. अध्यापनासाठी किमान पदवी पात्रता चार वर्षाची एकात्मिक बीएड असेल, पदवी जी ज्ञानाचा आशय आणि अध्यापन शास्त्र शिकवते आणि स्थानिक शाळांमध्ये विद्यार्थी अध्यापनाच्या रूपात सराव प्रशिक्षण समाविष्ट करते. तसेच ज्यांना विद्यापीठ महाविद्यालयीन शिक्षकांना अल्प आणि दीर्घकालीन मार्गदर्शन व्यावसायिक कार्य प्रदान करण्याची इच्छा असेल अशा अनुभवी गुणवंत ज्येष्ठ सेवानिवृत्त प्राध्यापकांना एकत्र करून एक राष्ट्रीय मिशन स्थापन केले जाईल.

### 4] उच्च शिक्षणात सुधारणा : भारतीय उच्च शिक्षण आयोग

पंधरा वर्षाच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने श्रेणीबद्ध मान्यता आणि श्रेणीबद्ध स्वायत्तेच्या योग्य प्रणाली द्वारे भारतातील सर्व उच्च शिक्षण संस्थांचे नावीन्य आणि उत्कृष्ट सत्तेसाठी कार्यरत स्वतंत्र स्वराज्य संस्था बनवण्याचे लक्ष आहे. उच्च शिक्षणाच्या प्रसारासाठी मानक ठरवणे, सामान्य शिक्षण परिषद, उच्च शिक्षण अनुदान परिषद, राष्ट्रीय मान्यता परिषद आणि नियमन राष्ट्रीय उच्च नियामक परिषद या स्वतंत्र विविध संस्थांसह एकच छत्र संस्था असेल ती म्हणजे भारतीय उच्च शिक्षण आयोग.

### 5] उच्च शिक्षणातील पटसंख्या प्रमाण सकल शैक्षणिक दर 2035 पर्यंत कमीत कमी 50 टक्के पर्यंत पोहोचवणे

2035 पर्यंत शिक्षणाचा उच्च शिक्षणातील निवळ पटसंख्या प्रमाण 26.3% वरून 50% पर्यंत वाढवण्याचे उद्दिष्ट आहे हे एक महत्त्वाचे राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे वैशिष्ट्य आहे.

### 6 ] व्यावसायिक शिक्षण

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 चे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे व्यावसायिक शिक्षण होय. 2025 पर्यंत शाळा व उच्च शिक्षण प्रणाली द्वारे किमान 50 टक्के विद्यार्थ्यांना व्यावसायिक शिक्षणाची संधी असेल. इयत्ता सहावी ते बारावी पर्यंतच्या विद्यार्थ्यांना सुट्टीच्या कालावधी सह व्यावसायिक विशेष शिकवण्यासाठी इंटर्नशिपच्या संधी असतील. ऑनलाईन पद्धतीने व्यावसायिक अभ्यासक्रम ही उपलब्ध करून देण्यात येतील.

### 7] शिक्षण तंत्रज्ञान

नॅशनल एज्युकेशनल टेक्नॉलॉजी फोरम ही एक स्वायत्त संस्था तयार केली जाईल. ज्यायोगे शिक्षण मूल्यांकन, नियोजन, प्रशासन वाढवण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर करण्याची, विचारांची मुक्त देवाणघेवाण होऊ शकेल. दीक्षा ,स्वयंम यासारख्या तंत्रज्ञानावर आधारित शिक्षण प्लॅटफॉर्मचे शाळांमध्ये, उच्च शिक्षणामध्ये अधिक चांगले एकत्रिकीकरण केले जाईल. मोठ्या प्रमाणामध्ये शिक्षणात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. कृत्रिम बुद्धिमत्ता यासारखे विषय देखील नवीन शैक्षणिक धोरणामध्ये अंतर्भूत करण्यात आलेले आहेत.

### 8] नॅशनल रिसर्च फाउंडेशन

देशभरात संशोधन आणि नावीन्यपूर्ण उपक्रम राबविण्यासाठी स्वतंत्र अस्तित्व असलेली एक नवीन संस्था स्थापन केली जाईल. या संस्थेचे नाव नॅशनल रिसर्च फाउंडेशन असे असेल. विद्यार्थ्यांना आर्थिक सहाय्य तसेच सामाजिक आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या समूहातील विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेस उत्तेजन देण्यासाठी प्रयत्न केले जातील.

### 9] शाश्वत विकासासाठी

संयुक्त राष्ट्रांनी 2000 मध्ये जागतिक विकासासाठी ठेवलेली जी उद्दिष्टे आहेत ती मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्स म्हणून ओळखले जातात. गरीबी ,शिक्षण, लिंग समानता, आरोग्य, पर्यावरण आणि जागतिक भागीदारी या क्षेत्रांचा समावेश केलेला आहे. या सर्व गोष्टींचा विचार करून नवीन शैक्षणिक धोरण हे शाश्वत विकासासाठी, त्याचप्रमाणे हे मिलेनियम डेव्हलपमेंट गोल्स साध्य करण्यासाठी एक दिशादर्शक असे धोरण आहे.

### 10] जागतिक दर्जाची स्वीकार्यता असणारे मुल तयार करणे

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मध्ये जागतिक दर्जाची स्वीकार्यता असणारे मुल तयार करणे हे एक महत्त्वाचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवून रचना करण्यात आलेली आहे. राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे "वसुधैव कुटुंबकम: ही संकल्पना राबवण्यासाठी निरनिराळ्या उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. जात, धर्म, वंश, लिंग, प्रदेश या कोणत्याही गोष्टीचा अडचण न ठरता या सर्व जमेच्या बाबी ठरून या शैक्षणिक व्यवस्थेतून तयार होणारे मुल हे जागतिक स्तरावर स्वीकारले जाईल अशा पद्धतीने अभ्यासक्रमाची रचना करण्यात येणार आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर घेतल्या जाणाऱ्या पिसा सारख्या परीक्षांमध्ये सध्या भारताची स्थिती ही दयनीय आहे. अशावेळी या राष्ट्रीय शैक्षणिक धोरणातून जागतिक पातळीवरील सर्व प्रकारच्या स्पर्धांना सामोरे जाणारे भविष्यवेधी शिक्षण देण्याची योजना केलेली आहे.

### 11] राष्ट्रीय उत्पन्नाच्या 6% शिक्षणावर खर्च करणे

कोणत्याही विकसित देशाची प्रगती हि तेथील शिक्षण व्यवस्थेवर अवलंबून असते .देशाच्या प्रगतीसाठी सक्षम शिक्षण व्यवस्था असणे खूप गरजेचे आहे नवीन शैक्षणिक धोरणामध्ये राष्ट्रीय उत्पन्नाच्या सहा टक्के उत्पन्न हे शिक्षणावर खर्च करण्यात यावे असे सुचविण्यात आलेले आहे.

### राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवताना येणाऱ्या संभाव्य अडचणी

नॅशनल एज्युकेशन पॉलिसी एनईपी 2020 राबवताना विविध अडचणींचा सामना करावा लागण्याची शक्यता आहे. या अडचणी खालील प्रमाणे

**1) पायाभूत सुविधांची कमतरता**

ग्रामीण आणि दुर्गम भागातील शाळांमध्ये आवश्यक त्या पायाभूत सुविधा जसे की अद्ययावत वर्गखोल्या, प्रयोगशाळा, ग्रंथालय, तंत्रस्नेही साधने इत्यादीची कमतरता आहे. नवीन शैक्षणिक धोरणातील उद्दिष्टे पूर्ण करण्यासाठी आवश्यक असलेल्या या सुविधा सर्व शाळांमध्ये निर्माण करणे हे एक महत्त्वाची अडचण ठरणार आहे. आजही भारतातील कित्येक खेड्यांमध्ये भौतिक सुविधांची मोठ्या प्रमाणात कमतरता आहे. अशा वेळेस शैक्षणिक धोरण राबवताना पायाभूत सुविधांची कमतरता हि एक महत्त्वाची समस्या ठरणार आहे.

**2) शिक्षकांचे प्रशिक्षण आणि गुणवत्ता**

नवीन शैक्षणिक धोरणानुसार शिक्षकांना अद्ययावत कौशल्य आणि तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे. परंतु सेवानिवृत्तीच्या जवळ असलेल्या किंवा पारंपारिक पद्धतीमध्ये कार्यरत असलेल्या शिक्षकांना नवीन तंत्र आत्मसात करण्यासाठी आव्हाने येणार आहेत. त्याचप्रमाणे शिक्षकांचे प्रशिक्षण आणि गुणवत्ता सुधारण्यासाठी मोठ्या प्रमाणावर निधीची देखील उपलब्धता करावी लागेल.

**3) विद्यार्थी आणि पालकांची मानसिकता**

नवीन शैक्षणिक धोरणामध्ये शिक्षण पद्धतीत अनेक बदल करण्यात आलेले आहेत. शैक्षणिक संरचनेमध्ये देखील मोठ्या प्रमाणावर बदल करण्यात आलेला आहे. अशावेळी पालक व विद्यार्थी हे नवीन प्रणालीशी कशा पद्धतीने जुळवून घेतात हे देखील पाहणे गरजेचे आहे. विशेषतः व्यावहारिक शिक्षण आणि कौशल्य विकासावर आधारित शिक्षणावर अधिक भर दिल्यामुळे पारंपारिक शैक्षणिक दृष्टिकोनातून विद्यार्थी पालकांमध्ये बदल होणे आवश्यक आहे .

**4) विविध विषयांच्या निवडीची गुंतागुंत**

विद्यार्थ्यांना मेजर, मायनर आणि इलेक्टिव्ह विषय निवडण्याची स्वायत्तता दिली गेलेली आहे. परंतु या विविध विषयांच्या निवडीमुळे शाळा आणि महाविद्यालयांना त्यांच्या अंमलबजावणी मध्ये अनेक प्रकारच्या अडचणी निर्माण होऊ शकतात.

**5) आर्थिक संसाधनांची उपलब्धता**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक असलेल्या आर्थिक संसाधनांची कमतरता अनेकदा जाणवते. विशेषतः नवीन तंत्रज्ञान, प्रशिक्षण कार्यक्रम आणि पायाभूत सुविधा उभारण्यासाठी पुरेशा निधीची आवश्यकता आहे.

**6) भाषा आणि सांस्कृतिक विविधता**

नवीन धोरणात मातृभाषेतून शिक्षणावर भर देण्यात आलेला आहे. परंतु भारतातील भाषिक आणि सांस्कृतिक विविधता लक्षात घेता सर्व राज्यांमध्ये हे धोरण समान रीतीने लागू करणे आव्हानात्मक ठरू शकते.

**7) देशभरामध्ये एक वाक्यता नसणे**

नवीन धोरणाबद्दल देशातील सर्व राज्यांमध्ये मतमतांतरे दिसून येतात. काही राज्यांनी या नवीन शैक्षणिक धोरण 2020 चा स्वीकार केला असून काही राज्यांनी मात्र यातील काही गोष्टींना विरोध करण्यास सुरवात केली आहे. नवीन शैक्षणिक धोरण राबवताना हा एक महत्वाची अडसर ठरणार आहे. यावर मात करण्यासाठी सर्व संबंधित घटकांनी जसे की शिक्षक , विद्यार्थी, पालक, शैक्षणिक संस्था आणि शासन यांनी एकत्रितपणे प्रयंत्न करणे आवश्यक आहे.

## संभाव्य अडचणी दूर करण्याकरता उपाययोजना

**1) आर्थिक निधीची उपलब्धता**

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण राबवताना सरकारला महत्त्वाचे म्हणजे पायाभूत सुविधा निर्माण करणे, शिक्षक प्रशिक्षण त्याचप्रमाणे अन्य बाबींसाठी मोठ्या प्रमाणावर निधीची आवश्यकता आहे. अशावेळी वेगवेगळ्या स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून त्याचप्रमाणे उद्योग जगतातून सीएसआरच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी जमवून तो आवश्यकत त्या ठिकाणी खर्च करता येऊ शकेल.

**2) शिक्षक प्रशिक्षण**

नवीन शैक्षणिक धोरणासंबंधी आणि त्यातील महत्त्वपूर्ण बदलांसंदर्भात शिक्षकांना योग्य असे प्रशिक्षण वेळोवेळी दिले जावे.

**3) विद्यार्थी व पालकांसाठी उदबोधन सत्रांचे आयोजन**

नवीन शैक्षणिक धोरणात आकृतीबंधातच बदल करण्यात आल्यामुळे बऱ्याच अंशी सर्वच बाबींमध्ये बदल होणार आहे. हा बद्दल नेमका काय आणि कसा आहे हे विद्यार्थी व पालकांना माहिती होण्यासाठी वेळोवेळी संबंधित यंत्रणांमार्फत वेगवेगळ्या शिक्षण तज्ञांचे विद्यार्थी व पालकांसाठी उदबोधन सत्र आयोजित करण्यात यावे.

**4) प्रशासकीय यंत्रणांचे प्रशिक्षण व सक्षमीकरण**

हे धोरण राबवताना त्याची उद्दिष्टे साध्य होत आहेत की नाही, त्याचप्रमाणे धोरण कशा पद्धतीने राबवले जावे यासाठी या प्रवाहात असणाऱ्या सर्व प्रशासकीय यंत्रणांचे प्रशिक्षण व सक्षमीकरण करणे आवश्यक आहे.

**5) सोशल मीडिया द्वारे जनजागृती**

आज समाजातील सर्व स्तरांमध्ये मोठ्या प्रमाणावर सोशल मीडियाचा वापर केला जातो. व्हाट्सअप, फेसबुक, इंस्टाग्राम अशा विविध सोशल मीडियाद्वारे या शैक्षणिक धोरणाबद्दल लोकांमध्ये जनजागृती करण्याचे काम करता येईल. नवीन शैक्षणिक धोरण आणि त्यातील महत्त्वपूर्ण बदलांची माहिती सोशल मीडियाद्वारे सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवणे शक्य होईल त्यामुळे मोठ्या प्रमाणावर सोशल मीडियाचा वापर करून जनजागृती करणे हा देखील एक महत्त्वपूर्ण उपाय म्हणून ओळखला जाईल.

## सारांश

राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 हे खऱ्या अर्थाने सर्वसमावेशक असे धोरण आहे. देशातील सुमारे दोन कोटी शाळाबाह्य विद्यार्थ्यांना शालेय शिक्षण प्रवाहात आणणे, शिक्षणातील 4.43% जीडीपीमध्ये 6% पर्यंत वाढ करणे, लिंग समानता राखणे, व्यावसायिक शिक्षणासह उच्च शिक्षणातील देखील सकल नोंदणी दर वाढवणे, पूर्व प्राथमिक स्तरातील वर्ग हे शालेय वर्गांना जोडणे, तसेच देशातील तरुण आणि प्रौढांमध्ये असलेली असाक्षरता दूर करून शंभर टक्के साक्षरता साध्य करणे, कौशल्याधिष्टित उपक्रम राबवून प्रत्येक व्यक्तीच्या हाताला काम देणे अशा पद्धतीचा व्यापक विचार या नवीन शैक्षणिक धोरणामध्ये करण्यात आलेला आहे. नवीन शैक्षणिक धोरण राबवताना चिकित्सकपणे या शिक्षण प्रवाहातील सर्वच घटक म्हणजे विद्यार्थी, शिक्षक, पालक, समाज, प्रशासकीय यंत्रणा, राज्य सरकार व केंद्र सरकार या सर्वांच्या परस्पर सहकार्याने हे धोरण अतिशय प्रभावीपणे राबविण्यात येऊ शकते. आपल्या देशाला जागतिक स्पर्धेमध्ये टिकवून "आत्मनिर्भर भारत" बनवण्याच्या दृष्टीने टाकलेले हे जणू एक क्रांतिकारी पाऊलच आहे. ही शैक्षणिक उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सर्वच यंत्रणांनी अविरत कष्ट घेणे गरजेचे आहे. निश्चितपणे एकविसाव्या शतकातील भारताचे पहिले शैक्षणिक धोरण सफल झाल्याशिवाय राहणार नाही.

## संदर्भसूची


1) राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 मसुदा
2) संकल्प मोठ्या शैक्षणिक बदलांचा प्रा डॉ केशव राजपुरे यांचा लेख नोव्हेंबर 2020
3) राष्ट्रीय शिक्षण धोरण 2020 चिकित्सा प्रा डॉ भालबा विभुते 6 जानेवारी 2022
4) महाराष्ट्र राज्य शैक्षणिक व संशोधन परिषद पुणे वाचन साहित्य 2023
5) नवे राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 एक चिकित्सक अभ्यास IAS लक्ष्मीकांत देशमुख
6) नवे शैक्षणिक धोरण विद्यार्थी पालकांसाठी मार्गदर्शन प्रा डॉ नितीन करमळकर जुलै 2024